# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
तळमजला,साखर संकुल इमारत, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
दूरध्वनी क्र ०२०-२५५१२८१३ ई-मेल :- estt4b@gmail.com

---

जा.क्र.कृ.आ.पुणे/आस्थापना शाखा-४/२०२१/१३२/२५७७५ दि. ०९/०८/२०२१

वाचा :-

१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र कृषिआ-१४१८/प्र.क्र.४१०/१६-अे, दि. ११/०१/२०२१

२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र आकृवि-१२१४/प्र.क्र.४२७/१५-अे, दि. २२/०४/२०१६

३) शासन निर्णय सा. प्र.वि. क्र. एआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि. ०९/०४/२०१८

४) शासन निर्णय सा. प्र.वि. क्र. एआरव्ही-२०२१/प्र.क्र.२०/कार्यासन १२ दि. २९/०७/२०२१

५) शासन पत्र क्रमांक कृषिआ-१०२१/प्र.क्र.१७५ /१६-अे दि. ०९/०८/२०२१

## आदेश

महाराष्ट्र सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय सेवा कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ६ मधील परंतुक २ व कलम ७ तसेच संदर्भ क्रं.२ अन्वये प्रत्यार्पित केलेल्या प्राधिकारानुसार नियतकालीक बदलीस पात्र असलेल्या कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील अधिका-यांना बदली अधिनियमातील कलम ४ (४) (दोन) व ५ (१) (क) व ५ (१) (ख) मधील तरतुदीनुसार वरिष्ठ सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अधिका-याचे नांव,पदनाम व सद्य कार्यालय | बदलीने पदस्थापना दिलेले ठिकाण | शेरा |
|---|---|---|
| श्री. गवळी अजय पुरूषोत्तम , कृषि अधिकारी, पंचायत समिती सोयगाव जिल्हा परिषद, औरंगाबाद | कृषि अधिकारी, पंचायत समिती गंगापूर जिल्हा परिषद, औरंगाबाद (श्री.पाटील रामकृष्ण अरविंद यांचे बदलीने रिक्त होणाऱ्या पदी) | नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार |

२. उक्त अधिकाऱ्यास बदलीने पदस्थापना दिलेल्या ठिकाणी शिर्षनिहाय सविस्तर पदस्थापना दर्शविली नाही त्यांना संबंधित कार्यालयातील शिर्षनिहाय म्हणजेच कृषि अधिकारी (सामान्य / विघयो) या शुध्द रिक्त असणाऱ्या अथवा बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांचे स्तरावरुन शिर्षनिहाय सविस्तर पदस्थापना देण्याची कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner

३. उपरोक्त बदली झालेल्या कृषि अधिका-यांनी आपले पदाचा कार्यभार समकक्ष वा नजिकच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवून बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा जिल्हयाचा एकत्रित अहवाल संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी/कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कृषि आयुक्तालयास सादर करावा.

४. संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या सद्याच्या पदभारातुन तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी त्यांना तात्काळ रुजु होण्यास निर्देश देण्यात येत आहेत. जे नियंत्रण अधिकारी बदली झालेल्या अधिकाऱ्यांना विहित मुदतीत कार्यमुक्त करणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आयुक्तालयास तात्काळ सादर करावा.

५. तसेच या आदेशान्वये संबंधित कृषि अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात येत असुन बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कार्यमुक्तीच्या दिनांकानंतर ते बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन त्यांचे वेतन अथवा कोणतीही देयके नियंत्रण प्राधिकारी यांनी अदा करु नये, बदलीनंतर संबंधित अधिकारी रुजु न झाल्यास अशा अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई तात्काळ करण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

स्वाक्षरीत/-
( धीरज कुमार )
आयुक्त,( कृषि )
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :- संबंधित अधिकारी ----------------------------------**

**प्रत:- माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव**

१) सहसचिव (आस्थापना), कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद --------------------------(सर्व)
३) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ---------------------------(सर्व)
४) विभागीय कृषि सहसंचालक----------------- (सर्व संबधित)
५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, --------- (सर्व संबधित)

२/- सदरचे आदेश विभागाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असुन सर्व संबंधितांचे निदर्शनास आणुन द्यावेत व बदली झालेल्या अधिका-यांचे संदर्भात आदेशात नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाहीच्या सुचना संबधित नियंत्रण अधिकारी यांना देण्यात याव्यात. तसेच आपल्या संभागाचा एकत्रित कार्यमुक्त व हजर अहवाल आयुक्तालयास सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

९/८/२१
( अशोक बाजीराव गिरवले )
प्रशासकीय अधिकारी (आस्था-४),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned by CamScanner